# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०५.०४.२००६ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक **५ एप्रिल २००६** रोजी (दिनांक ३१.३.२००६ रोजीची तहकूब करण्यात आलेली सभा) मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ‘‘प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ‘‘येथे दुपारी १२.३० वाजता ‘‘वंदेमातरम्‘‘ या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०३. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०४. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०५. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०६. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०७. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०८. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०९. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१०. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
११. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१२. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१३. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१४. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१६. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१७. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१८. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१९. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२०. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२१. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२२. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२३. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२४. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२५. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२६. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२७. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२८. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
२९. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३०. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३१. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग

३२. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३३. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३४. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३५. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३६. स.स.श्री.खान निसार मो.खान
३७. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
३८. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३९. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४०. स.स.सौ.राऊत छाया विलास
४१. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४४. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४५. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४६. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४७. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४८. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
४९. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
५०. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५१. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५२. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५३. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५४. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५५. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५६. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५७. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५८. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५९. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६०. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६१. स.स.श्री.खुडे विजय किसन
६२. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६३. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६४. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६५. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६६. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६७. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६८. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७०. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७१. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७२. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
७३. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर

७४. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७५. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७६. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७७. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७८. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७९. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८०. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८१. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८२. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८३. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
८४. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०२. स.स.श्री.राजेश व्यास
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**संवाद :**

श्री. बाबासाहेब डांगे : स.सदस्या सौ.सुशिला रगडे यांचे दिर स्व.लिंबाजी रगडे यांचे दु:खद निधन झालेले आहे त्यांना सभागृहा तर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी.

डॉ. भागवत कराड :यास माझे अनूमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे श्रध्दाजंलीसाठी सर्वांनी उभे रहावे.

याच वेळी स्व. लिंबाजी रगडे यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मा.आयुक्त यांनी आजच्या बैंठकीला उपस्थित असणे आवश्यक होते. उपस्थित नाही. सभागृहाला माहिती दयावी.

मा. महापौर :१० मिनीटात मा.आयुक्त सभागृहात येत आहे. चर्चेला सूरूवात करावी.

श्री.तरविंदरसिंग धिल्लन :आज बजेटची बैठक आहे. माजी सैनिकासाठी मालमत्ता कर माफ करावे शासनाने मंजूर केलेले आहे १९९७ चा जी. आर. जे माजी सैनिक असतील किंवा त्यांचे निधन झालेले असेल त्यांची पत्नी हयात असतील तर यांचेसाठी शासनाने मालमत्ता कर माफ केलेला आहे. महानगरपालिकेने माजी सैनिक जे असतील त्यांचे एक मालमत्ता कर माफ करावा तसेच पाणी पट्टी माफ केल्यास आणखीच योग्य होईल.

डॉ. भागवत कराड : आज बजेटची बैठक असल्यामूळे विषयावाईज बजेटवर चर्चा करावी मध्ये एखादा विषय घेवून चर्चा करणे योग्य नाही.मालमत्ता कर माफ केल्यास महापालिकेचे उत्पन्न कमी होणार आहे .याचाही विचार करावा. माफ करण्यास विरोध नाही. परंतू एक एक विषयावर चर्चा व्हावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:कोणत्या नियमानूसार मालमत्ता कर माफ करता येतो प्रशासनाने खूलासा करावा.माफ करण्याचा अधिकार आहे काय नसता महापालिकेची बदनामी होईल.

मा.महापौर :या विषयावर नंतर चर्चा करता येईल. बजेटनूसार चर्चा करावी. आता पान क्र २२ वर जकातवर चर्चा करावी.

डॉ. भागवत कराड :जकातीच्या माध्यमातून १०१.२५ कोटीचे उत्पन्न महापालिकेस मिळणार आहे. जकात खाजगीकरण करून एक महीना झालेला आहे अपेक्षेप्रमाणे जे उत्पन्न यावयास पाहिजे ते येत आहे काय याचा खूलासा घ्यावा.

मा. महापौर :प्रशासनाने या संबधी खूलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) : खाजगी अभिकर्ता सहकार एजन्सीज प्रा.लि.यांना १ मार्च २००६ पासून जकात वसूलीचे काम दिलेले आहे.सदर अभिकर्ता यांचेशी करार करतांना महाकपालिकेस १०१.२५ कोटी रक्क्म अपेक्षीत आहे. सदर रक्मम महापालिकेस समान ५० हप्त्यात मिळाणार आहे. मार्च महिण्यात महापालिकेस चार हप्त्यात ८.६७ कोटी रक्कम प्राप्त झालेली आहे. जो अपेक्षीत हप्ता होता त्यापेक्षा जास्त रक्कम प्राप्त झालेली आहे. काही चोरीचे केसेस व महानगरपालिकेचे जे न्यायालयात प्रकरण चालू आहे त्या प्रकरणामधून महापालिकेला आणखी महसूल प्राप्त होवून १०२ कोटी रूपये उद्दीष्ट सहज साध्य होईल असे प्रशासनाचे मत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:अगोदर सूधारीत अर्थसंकल्पावर चर्चा करावी. सन २००५-०६ चे सूधारीत जे बजेट दिले . मी यापूर्वीही म्हटले होते की जे २३० कोटीचे बजेट जास्तीचे आहे. मा. सभापती यांनी २१५ कोटीचे बजेट दिले व **३० कोटी** शिल्लक रक्कम दाखवली. **३० कोटी** जे शिलकीची रक्कम आहे ती शासनाने दिल्यानंतरही शिलकी दाखवली. वसूली ही माझ्या मते ६० कोटी कमी झाली. १७० कोटीचे खरे रिवाईज बजेट दिले. आहे. यात ४० कोटी अनुदान मिळाल्यानंतर हे २१५ कोटीचे बजेट झाले. जे ३० कोटीची शिलकी रक्कम यामध्ये दिली आहे. ही तफावत प्रत्येक बजेट मध्ये येईल. आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की डब्ल्यू पान क्र ५ ते ४५ पर्यत स्पिल ओव्हरची कामाची यादी दिली. एवढी कामे स्पिल ओव्हरमधे महापालिकेच्या इतिहासात पहिल्यादांच आलेली दिसते. ही कामे करून जी कामे प्रस्तावित केलेली आहे ती होणार की नाही तसेच सन २००५-०६ चे जकातीचे उदि्ष्ट ८३ कोटीचे पूर्ण केलेले आहे असे म्हटले आहे. आता जकातीचे खाजगीकरण करण्यात आले व २१ कोटीची जकातीच्या उत्पन्नात वाढ होईल असे म्हटले आहे. मागिल वर्षी ८३ कोटी वसूल झाले तर या वर्षी नैसर्गीक वाढ विचारात घेता ९६ कोटीची वसूली प्रशासनाने केले असते. केवळ ४ कोटी साठी जकातीचे खाजगीकरण केलेले आहे हे सूध्दा जनतेसमोर जायला पाहिजे. आज नाक्यावर रोजच्या तक्रारी होत आहे.दखल घेतली जात नाही. शहरातील जनतेला त्रास होत आहे.

मा. महापौर :किती फायदा झाला व किती होणार आहे. सभागृहाने निर्णय घेतलेला आहे आपणही सभागृहात उपस्थित होते. बजेटच्या विषयावर आपण बोलावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :जकात खाजगीकरणाचा जेंव्हा प्रस्ताव आला त्यावेळी सभागृहाची प्रशासनाने दिशाभूल केलेली आहे. जकात खाजगीकरण केले. चार कोटीच जास्त मिळणार आहे. रोज नाक्यावर तक्रारी होत आहे.

श्री. देसरडा प्रशांत : सुधारीत बजेटवर चर्चा व्हावी. इतर विषयावर बोलू नये अशा सूचना स. सदस्यांना कराव्यात.

डॉ. भागवत कराड :दिशाभूल केलेली नाही. सभागृहात स. सदस्य होते. हा आरोप त्यांनी मागे घयावा.

याच वेळी मा. महापौर डायस समोर स. सदस्य जमा होतात मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : एक एक स. सदस्यांनी बोलण्याच्या सूचना कराव्यात.

मा.महापौर :सभागृहाने दिशाभूल केलेली नाही. जकात खाजगीकरणाचा प्रस्ताव सभागृहात आला त्यावेळी सर्वाच्या सम्मतीने निर्णय घेतलेला आहे. सभापती,स्थायी समिती यांनी बजेट सादर केलेले आहे त्यावर चर्चा करावी.

मा.उपमहापौर :आजची बैठक ही बजेटची असून उत्पन्न कसे वाढविता येईल व त्यानूसार खर्च केला जातो. यावर चर्चा करावी. इतर चर्चा करू नये ही विनंती.

मा.महापौर :एक सदस्य बोलत असतांना दूसरे सदस्य यांनी मध्ये बोलू नये. एक दुसऱ्यावर आरोप न करता महापालिकेचे उत्पन्न कसे वाढविता येईल यावर चर्चा करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:१०९ कोटीचे टेंडर काढले . ९८ कोटीची निविदा आली होती. ती रद्द केली पून्हा टेंडर काढले १०१ कोटीचे आले. चार कोटीसाठी खाजगीकरण केले.यात सभागृहाची दिशाभूल झाली.

मा. महापौर :दिशाभूल केलेली नाही. सभागृहात प्रस्ताव आला त्यावेळी आपणही उपस्थित होते. आरोप करणे बरोबर नाही. पून्हा विनंती की आपण बजेटवर चर्चा करावी.

(याच वेळी मा.आयुक्त सभागृहात येतात. )

श्री.मनमोहसिंग ओबेरॉय :चर्चेत आमच्या सदस्यांचा सहभाग नाही. उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने निर्णय घेतलेला होता. यात स्पील ओव्हरची कामे ही ४० ते ५० टक्के आहे असे असेल तर इतर चालू वर्षातील कामे होतील काय यात ४० कोटीची कामे केवळ सिडको भागासाठी आहे शहरासाठी कमी निधी ठेवलेला आहे.

श्री. सिताराम सुरे :मागिल वर्षीपेक्षा या वर्षात मालमत्ता कर व इतर कराच्या माध्यमातून चांगली वसूली झालेली आहे. यामूळे सर्व प्रभागात विकास कामे होतील. माझ्या वार्डात ३६ मीटरचा रस्ता आहे. तो डिफर पेमेन्ट मध्ये समावेश करण्यात यावे.

श्री. मनमोहसिंग ओबेरॉय :स. सदस्य प्रस्ताव ठेवतात म्हणून पोलीस केस झालेल्या आहे. असे आणखी प्रस्ताव आम्ही ठेवले तर आमच्यावर कार्यवाही होवू शकते.जसे बीओटीचे प्रस्ताव आहे. याकडे प्रशासनाचे लक्ष वेधु इच्छितो की जे स. सदस्यांवर गुन्हे दाखल केले यात त्याची काय चूक होती.खुलासा होणे गरजेचे आहे.

मा.महापौर :आज विशेष सभा असून तहकूब सभा आहे अर्थसंकल्पावर चर्चा करावी. बीओटीचे प्रस्ताव आपल्या समोर नाही. ते येतील तेंव्हा चर्चा करता येईल.

(याचे वेळी मोठमोठयाने स. सदस्य बोलतात काहीही ऐकू येत नाही.)

श्री. पुरूषोत्तम ठाकूर :अर्थसंकल्पावर चर्चा करावी. मूळ विषय सोडून इतर विषयावर चर्चा होवू नये. वार्डात विकास कामे होण्याच्या दृष्टीने बजेटवर चर्चा करावी.

मा. महापौर : बीओटीचे काही प्रस्ताव स्थायी समितीने मंजूर केले असतील त्यांना अधिकार होते. त्यांनी मंजूर केले आहे.बजेटवर जो प्रश्न उपस्थित करणार आहे मा. सभापती उत्तर देतिल परंतू बजेटवरच चर्चा करावी. इतर विषयावर चर्चा करू नये.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : सदस्यांचा काही तरी गैरसमज झालेला दिसतो. ही सभा बजेटची आहे. त्यावर चर्चा व्हावी. काही स. सदस्य भावनेतून बोलतात त्यात वाईट वाटून घेण्यासारखे काहीही नाही. स. सदस्यांची जी भावना होती ती त्यांनी सभागृहाच्या समोर ठेवली. सर्वांना विनंती की एक सदस्य बोलत असतांना दूसऱ्या सदस्यांनी मधेच बोलू नये. पहिल्यादांच असे बजेट पाहतो आहे. जकात खाजगीकरणाला पूर्ण परवानगी दिली नाही. स्थायी समितीने त्याचे अधिकारात मंजूरी दिली. स्थायी समितीमधे ज्या सदस्यांनी विरोध केला नसेल तर त्यांना या सभागृहात त्यावर बोलण्याचा काहीही अधिकार नाही.एक सदस्य बोलत असतांना दुसऱ्या सदस्यांनी मधे बोलू नये. बजेट यावर सखोल अशी चर्चा व्हावी अशी विनंती आहे.

श्री. मुजीब खान :स. सदस्य श्री. मनमोहनसिंग आबेरॉय जे बोलत होते ते बरोबर होते. जकातीचे खाजगीकरण केल्यामूळे स.सदस्यांच्या घरावर लेटर डकविले गेले. महापालिकेची व स.सदस्यांची बदनामी झाली. त्यांची अशी भावना होती की आमच्या प्रश्नाचे उत्तर दयावे. स. सदस्यांच्या भावनेचा विचार करावा.

मा.महापौर : स.सदस्यांच्या भावनेचा कदर करतो परंतू आजची सभा ही बजेट ची आहे. येत्या १३ तारखेला सर्वसाधारण सभा आहे त्या सभेत हा प्रश्न उपस्थित करावा.

श्री. देसरडा प्रशांत :सन २००५-०६ चे सूधारीत अर्थसंकल्प ठेवलेला आहे. मागिल वर्षी मालमत्ता कराचे उद्दिष्ट ४१.२६कोटीचे तर पाणीपटट्टी उद्दिष्ट हे ४० कोटीचे होते परंतू वसूलीचे प्रमाणे हे फक्त ३७ टक्केच आहे. झोन वाईज वसूलीचे प्रमाणे किती याचा खूलासा तसेच ३७ टक्क्केच वसूली का झाली याचा खूलासा व्हावा.४० कोटी पाणीपट्टीचे उद्दिष्ट असतांना १८ कोटीच व मालमत्ता कराचे उदिद्ष्ट ४१ कोटीचे असतांना २४ कोटीच का वसूल झाले. ज्या अधिकाऱ्यांनी वसूली केली नाही त्यांचेवर काय कार्यवाही केलेली आहे. ज्या अधिकाऱ्यांनी चांगली वसूली केली त्यांना इन्सेन्टीव्ह दिला का या सर्व बाबीचा खूलासा व्हावा.

डॉ. भागवत कराड :जकात वसूली ही ८३ कोटी वसूल होणे अपेक्षीत होते तेवढी वसूल झालेली आहे का याचा खूलासा करावा.

श्री. संजय जोशी :मागच्या बजेटच्या वेळी मी बोललो होतो की वसूलीची जबाबदारी ही संबधीत त्या त्या अधिकाऱ्यावर निश्चित करावी. ती प्रशासनाने केलेली नाही. जेणे करून संबधीत अधिकारी यांना जबाबदार धरता येईल.

मा.सभापती :झोन वाईज मालमत्ता कर व पाणीपट्टी वसूली संदर्भात उपआयूक्त(महसूल) यांनी खूलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) : जकात वसूलीचे उद्दिष्ठ ८३ कोटीचे होते मार्च अखेर वसूली ही ८१.३५कोटी म्हणजे जवळपास ९९ टक्के वसूली झालेली आहे. मालमत्ता कराचे सूधारीत उद्दिष्ट २४ कोटीचे दिले होते.प्रभाग कार्यालय अ ने दिलेल्या उद्दिष्टाच्या ४२ टक्के म्हणजेच २.२४ कोटी वसूल केलेली आहे.प्रभाग कार्यालय ब मधे उद्दिष्टाच्या २९ टक्के म्हणजेच रूपये १.९६ कोटी, प्रभाग कार्यालय क मधे १.३८ कोटी उर्दिष्टाच्या ४३ टक्के तर प्रभाग कार्यालय ड मधे ४.८२ कोटी ४० टक्के प्रभाग कार्यालय इ १.१३ कोटी म्हणजेच २३ टक्के प्रभाग कार्याल फ मधे ३.९२कोटी म्हणजेच ४२ टक्के वसूली मालमत्ता करातून मिळालेली आहे.पाणी पट्टीचे सुधारीत उद्दिष्ट २७ कोटीचे होते. प्रभाग कार्याल अ मधे २.०८ कोटी उद्दिष्टाच्या ३९ टक्के, प्रभाग कार्यालय ब मधे ४.०६ कोटी उद्दिष्टाच्या ८५ टक्के, प्रभाग कार्यालय क मधे १.३९ कोटी उद्दिष्टाच्या ४३ टक्के , प्रभाग कार्यालय ड मधे २.४८कोटी उद्दिष्टाच्या ३२ टक्के, प्रभाग कार्यालय इ मधे १.६९ उद्दिष्टाच्या २७ टक्के , प्रभाग कार्यालय फ मधे २.४१ कोटी उद्दिष्टाच्या ३३ टक्के वसूली झालेली आहे. मालमत्ता व पाणी पट्टी मिळून ३१ .४५ कोटी वसूली झालेली असून मागिल वर्षीपेक्षा वसूली जास्त झालेली आहे.

श्री. महेश माळवतकर :प्रभाग कार्यालय ब मधे ८५ टक्के पाणी पट्टी वसूल होत असतांना त्या भागात पूरेसे पाणी का दिले जात नाही. वसुली जास्त होत असतांना सिडको हडको भत्तगात सम प्रमाणात पाणी मिळाले पाहिजे.आजही इतर भागापेक्षा कमी प्रमाणात पाणी दिले जाते यावर प्रशासन काही उपायोजना करणार की नाही. याचा खूलासा करण्यात यावा.

श्री. प्रशांत देसरडा :मालमत्ता करामधे कूठेही ५० टक्केपेक्षा जास्त वसूली झालेली नाही. परंतू प्रत्येक वेळेस असे सांगितले जाते की मागिल वर्षी पेक्षा या वर्षी इतकी वसूली वाढलेली आहे. मालमत्ता करामधे प्रभाग कार्यालय इ मधे २३ टक्केच वसूली होते तर दुसऱ्या प्रभाग कार्यालय येते ४३ टक्के वसूली होते जेथे २३ टक्के वसूली होते तेथे कर्मचारी नव्हते का वसूली कमी होण्याचे कारण काय यांचाही खूलासा

होणे गरजेचे आहे. त्या त्या अधिकाऱ्याच्या कार्यक्षमतेप्रमाणे काम दिले जाईल असे आयुक्तांच्या मनोगतमधे दिसून आले. असे होत असेल तर त्या त्या अधिकाऱ्याचे पगार सुध्दा त्यांचे कार्यक्षमतेप्रमाणेच असावेत. एक प्रभाग कार्यालयात २३ टक्के वसूल होते तर दुसऱ्या प्रभाग कार्यालयात ४३ वसूली होत असेल तर ज्या अधिकाऱ्यानी वसूली कमी केलेली आहे त्याचेवर कार्यवाही झाली पाहिजे.

उपआयुक्त (महसूल) : जे आकडे मी टक्केवारीमधे सांगितलेले आहे ते मुळ उद्दिष्ट असे आहे. सुधारीत उद्दिष्टाची तूलणा केली तर १५ टक्केने वसूली जास्त झालेली आहे. ज्यावेळी सन २००५-२००६ च्या पाणीपट्टी व मालमत्ता कराच्या एकूण डिमांड्चा सखोल अभ्यास केला तर असे लक्षात आले की अनेक डिमांड हे दोन वेळेस झालेले आहे. रेकॉर्डच्या काही अडचणीमूळे एकाच मालमत्ता धारकास दोन तीन डिमांड दिलेल्या आहेत. ही डिमांड लक्षात आल्यानंतर जवळपास २० कोटीने कमी झाली.प्रभाग कार्यालय इ मधे बहुतंशी गुंठेवारीचा भाग येतो. या भागात आतापर्यत मालमत्ता कर अगदी नगण्य वसूल होत होती.या प्रभागात जी १.१३ कोटी वसूली झालेली आहे ती ८०-९० टक्के पहिल्यादांच वसूल झालेले आहे. वसूलीची जी पध्दत आहे ती अतिशय योग्य प्रकारे सेट झालेली आहे. आणि ज्या काही तृटी आलेल्या आहेत त्या निश्चितपणे दूर केल्या जातील. जेंव्हा चांगली वसूली होत नव्हती तेथे वसूलीसाठी चांगले प्रयत्न करीत आहोत.

श्री. देसरडा प्रशांत :जी मालमत्ता वसूली झाली ती जून्या मालमत्ता आहे काय जे उद्दिष्ट दिले ते चूक आहे काय ?गुंठेवारी भागात कर आकारणी करीत नाही काय ?गुंठेवारी भागात पाणी देत नाही का?

उपआयुक्त (महसूल) :ज्या मालमत्ता आहे त्या संर्वांना कर लावलेला आहे. स्पेक या संस्थे मार्फत काही मालमत्तांना कर लावायचा आहे.

श्री. देसरडा प्रशांत :स्पेक संस्थेचे नाव घेवू नये. सर्वेचे काम त्यांनी चांगले केलेले नाही. महापालिकेचे नूकसान केलेले आहे.

श्री. संजय जोशी :वसूली का कमी झाली ते सांगावे स्पेक यां संस्थेचे नाव सभागृहात घेवू नये.

श्री. महेश माळवतकर :आताच खूलासा केला प्रभाग कार्यालय ब वगळता इतर कोणत्याही प्रभाग कार्यालयात ५०टक्के पेक्षा जास्त वसूली नाही जे रेग्यूलर भरतात त्यांचीच दमदाटी करतात. जे कर भरत नाही त्यांचेवर काय कार्यवाही होते.जे कर भरत नाही त्यांचेवर कडक कार्यवाही केली पाहिजे.

सौ. लता दलाल :गेल्या दोन वर्षापूर्वी स्पेक या संस्थेला सर्वेचे काम दिले व एक वर्षात सर्वे करून दयावा म्हणून काम दिले होते. जी मालमत्ता वाढलेली आहे कर वाढलेला आहे त्यांचा पूर्णपणे खूलासा यायला हवा होता. या संस्थैने महापालिकेला फसवले हा माझा स्पष्ट आरोप आहे. वेळीच सदर संस्थेने सर्वेचे काम करून दिले नाही उलट गेल्या वर्षी जो मालमत्ता च्या माध्यमातून कर मिळणार होता तोही बुडाला आहे. या कामात मोठा घोळ करून ठेवलेला असून पून्हा नागरीकांना नोटीसेस दिल्या की आणखी इतका कर वाढला म्हणून जेथे एक हजार कर असेल तेथे १० हजार केला गेला तर जेथे ५०० रूपये होता तेथे २००० हजार करण्यात आला. नवीन कर म्हणून दाखवलेले आहे. ज्यांचे घरामधे कोणताही बदल झालेला नाही तरीही कर वाढवून आलेला आहे. जी वसूली व्हायला पाहिजे होती ती प्रशासन या स्पेकच्या सर्वेमूळे करू शकले नाही. या स्पेकच्या सर्वेमूळे अनेक अडथळे निर्माण झालेले आहे. किमान ८० टक्के वसूली तरी झालेली नाही.

श्री. संतोष खेंडके : गुंठेवारी भाग आहे म्हणून तेथे वसूली करणार नाही का तेथे कामे करणार नाही का, याचाही खूलासा करावा.

मा. महापौर : जो जो भाग गुंठेवारी होत आहे त्या त्या भागात कामे करणारच आहोत.

श्री.अ.रशिद खान : परवा जे ३४ कोटी रूपये दिले त्याचा उल्लेख बजेटमधे आलेला नाही. बजेटबूक मधील ओ-ए-१ वर नवीन खडी रस्ते नवीन डांबरीकर पूर्ण शहरामध्ये करोडो रूपयाचे काम फक्त ३ हजार व २५० स्क्वेअर फुट काम होत आहे काय ?

मा. महापौर : चूकीने नमूद झालेले आहे. किलोमीटर चे जागेवर वर्ग मिटर झालेले आहे. दुरूस्ती करून घेतली जाईल.

सौ.खान अजरा जबीन : यात आकडयाचा खेळ नजरेसमोर दिसत आहे. यात सत्य काही दिसत नाही. ५० टक्के कामे ही स्पील ओव्हरमधे आहे. शेवटी काही कामे अनधिकृत वसाहतीतील होते ते करता येत नाही म्हणून रद्द केलेले दिसून येते. अर्धे काम रद्द केले व ५० टक्के कामे स्पील ओव्हरमधे आले तर कोणती कामे करण्यात आलेली आहे याचा खूलासा व्हावा. मागिल बजेटमधील स्पील ओव्हरचे काम या बूकमधे स्पील ओव्हरमधे टाकण्यात आले. लाखो रूपये विकास कामावर खर्च केलेले दाखविण्यात येते परंतू कामे कोणतीच होत नाही. असे दिसते. स्पील ओव्हरची कोणती कामे आज चालू आहे. किती कामे करण्यात आलेली आहे याची माहिती होणे आवशक आहे. बजेट बुक मधील सर्व कामे झाली असतील तर शहराचा मोठया प्रमाणात विकास झालेला दिसून आला असता. परंतू कोणतेना कोणते कारण दाखवून काम रद्द केले जाते हे योग्य नाही. जी कामे नमूद केलेली आहे ती या वर्षी पूर्ण होतील का ?

मा.महापौर :स्पील ओव्हरची जी कामे आहे ती पूर्ण होतील.

श्री.मुजीब खान :मागिल वर्षाचे पूर्ण कामे स्पील ओव्हरमधे टाकण्यात आलेली आहे. कोणती कामे झालेली आहे याचा खूलासा घ्यावा. एक ठराविक भागातील कामे जसेच्या तसे स्पील ओव्हरमध्ये टाकण्यात आलेली आहे.पान क्र डब्ल्यू ७ वर क्र ६ चे काम स्पील ओव्हरमध्ये आले. अशी अनेक कामे आहे.

मा. महापौर : पूर्ण वार्डातील मिळून स्पील ओव्हरमधे कामे आलेली आहे.पान क्र ५ पासून स्पील ओव्हरचीच कामे आहे. संपूर्ण वार्डातील आहेत.

श्री.मुजीब खान :आपल्या निदर्शनास आणून दिले आहे. अधिकारी यांनी चालबाजी आहे. जाणूनबूजून स्पील ओव्हरमधे टाकले आहे.

श्री. सलीम पटेल :डब्ल्यू ८ पान वर क्र २४ चे नागसेन कॉलनी येथील कामाचे वर्क ऑर्डर देवून चार महिने झाले काम झाले काम सुरू झाले नाही. स्पील ओव्हर मध्ये आले आहे.

मा.महापौर :वर्क ऑर्डर होवून चार महिने झाले . तरीही कामे झाली नाही स्पील ओव्हरमधे आली अति.शहर अभियंता यांनी खुलासा.

अति.शहर अभियंता :याकामाचे कार्यादेश देण्यात आलेले होते.परंतू संबंधीत ठेकेदार यांना एकूण १० कामे मिळालेली आहे.कामाचा वेग फारच कमी आहे.आतापर्यत त्यांनी नऊ कामे सुध्दा पूर्ण केली नाही.व नागसेन कॉलनी येथील हे काम त्यांनी हाती घेतले नाही म्हणून त्यांना काळया यादीत समावेश करण्याची कार्यवाही प्रस्तापित केलेली आहे

श्री. सलीम पटेल : संबधीत ठेकेदारास कामाची मूदत दिलेली होती. दिलेल्या मुदतीत त्यांनी काम केले नाही. तरी काम देतांना संबधीत ठेकेदार यांना जास्तीची कामे दिली व त्यांनी काम केले नाही तर यास जाबाबदार कोण ?

मा.महापौर :संबधीत ठेकदार यांचेवर कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे. मा. आयुक्त त्यानूसार कार्यवाही करतील.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:यामूळे स्पील ओव्हरमधे कामे गेलेली आहे. अगोदरचे काम संबधीत ठेकेदाराने पूर्ण केल्यानंतर त्यास दुसरे काम दिले पाहिजेयावर प्रशासनाने विचार केला पाहिजे

मा. महापौर :जे जवळपास २६ ते २७ कोटीची स्पील ओव्हरची कामे आहे ते एक महिण्यात प्रशासनाने कुठल्याही परीस्थितीत सूरू करावी.

श्री. नरवडे वसंत :पावसाळा सूरू झाल्यानंतर कामे करता येत नाही. दोन महिण्याची मूदत दयावी या मूदतीत विकास कामे झाली पाहिजे.

श्री. खेडंके संतोष :या वर्षाची जी नवीन कामे आहेत तेही तीन महिण्याच्या आत सूरू करण्यात यावी.

श्री. नरवडे वसंत : जी काही नवीन कामे आहे स. सदस्यांनी दिलेली असतील त्या कामाचे अंदाजपत्रक ताबडतोब तयार न होणे व ते बाहेरून तयार करावयाचे असतील तर अशा तांत्रिक अडचणी असतील त्या सोडवण्याकरीता मा. महापौर व आयुक्त यांना विनंती करेण की, बजेट मधील प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक केंव्हा तयार होतील. स्पील ओव्हरच्याच कामाना तीन महिणे लागत असतील तर पूढील सहा महिण्यातही बजेटमधील कामे होणार नाही. व पून्हा स्पील ओव्हरमधे ही कामे जातील. अंदाजपत्रक तयार करण्यास मर्यादा घालून दयावी जेणे करून शहरातील विकास कामे लवकर होतील.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर :पूर्ण वर्षभर विकास कामे झालेली नाही. स्पील ओव्हरची कामे ही दोन तीन महिण्यात व्हावी तसे आदेश दयावे. २५ ते ३० टक्केच कामे झालेली आहे.

श्री. कचरू मोरे : वार्ड क्र ९२ मधे जी कामे मागिल वर्षी प्रस्तावित केलेली होती ती कामे झालेली नसून या बजेटमधे आलेली नाही. एकूण सहा ते सात कामे होती ती या बजेटमधे स्पील ओव्हर मध्ये घेण्यात यावी. १६ लाखांची कामे आहेत. ३/४ प्रकारची कामे असून मागील वर्षाच्या अर्थसंकल्पात पान क्र.१२७ वर आहेत.

डॉ. भागवत कराड : महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढेल यावर चर्चा होणे गरजेचे आहे तसेच खर्च कसा होईल व स्थायी समितीने विशेष अशा काही सूचना दिलेल्या आहेत काय त्यावर काही फेरबदल करावयाचा काय ?यावर चर्चा होण्याची गरज आहे. विकास कामाचा प्रश्न नंतर येईल अगोदर महानगरपालिकेच उत्पन्न कसे वाढेल यावर चर्चा करावी.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :अशा पध्दतीने चर्चा होवून बजेट मंजूर होणार नाही. या बाबत पॉलीसी ठरवावी लागेल. या बजेटमधे स्पील ओव्हरची कामे जास्त आहे. त्याचेकारण असे की मी मागे एकदा बोललो होतो की. जेव्हा बजेट समोर येते ते लेखा विभागाकडून येते. टेंडर जे होते ते लेखा विभागाकडूनच होते. परंतू प्रत्येक वेळा संचिका मंजूरीसाठी लेखा विभागाकडे जाणे आवशक आहे काय?काम करण्याची पध्दत बदलावी. जे विभाग प्रमूख कार्यकारी अभियंता आहे त्यांना अधिकार दयावे त्याचेवर जबाबदारी फिक्स करावी. जेणे करून कामांना उशीर होणार नाही व स्पील ओव्हरमधे कामे जाणार नाही. एक हजार रूपयाचा चेक मिळवण्यासाठी एका एजन्सीधारकास तीन महिने लागले. ही सिस्टीम बदलावी जो पर्यत ही सिस्टीम बदलत नाही तोपर्यत कामांना गती येणार नाही. बजेट मंजूर करतांना उत्पन्न कसे येणार ,कशाच्या माध्यमातून येणार व खर्च कसे करणार या पध्दतीने मंजूर करावे. एखादया वार्डातील काम आले नसेल तर तसे पत्र देवून मा.महापौरांशी स.सदस्य चर्चा करू शकतात. एक एक विषयावर चर्चा करावी.

मा.महापौर :आताच स. सदस्य श्री.पाथ्रीकर यांनी जे सीस्टीम बदलण्या बाबत बोलले त्या संदर्भात कामे लवकरात लवकर कसे करता येतील या संबधीत काय उपाययोजना करता येईल मा.आयुक्तांनी खूलासा करावा.

मा.आयुक्त :आताच स.सदस्य श्री.पाथ्रीकर यांनी जो प्रश्न उपस्थित केला की पहिल्या मंजूरीपासून संचिका शेवटी वर्क ऑर्डर झाल्यानंतर त्या कामाचे बील अदा करे पर्यंत संचिका मंजूरीस वेळ लागतो. ही वस्तुस्थिती आहे परंतू यापूर्वी मी संबधीत विभागाचे अधिकारी यांना सांगितले होते की जी एकच संचिका दोन वेळेस एकाच विभागात जाते ती दोन वेळा जावू नये म्हणून यात बदल होण्याची गरज आहे. या साठी एक बैठक घेवून जी प्रोसेसला वेळ लागतो तो कमी करणार आहे. टेंडर वगैरे करण्यास वेळ लागतो त्यासाठी E- टेंडर पध्दतीचा अवलंब करणार आहोत. स्थायी समितीने त्यास मान्यता दिली आहे एक महिण्यात कार्यवाही सूरू होईल. जो प्रोसेसला वेळ लागतो तो कमी होईल. त्या बाबतचे एक पत्र काढणार व ते मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेपूढे ठेवणार आहे. स्पील ओव्हरमधे कामे येण्याचे कारण म्हणजे मागिल वर्षाचे बजेट उशीरा मजूंर झाले होते, चार पाच महिनेच काम करण्यासाठी मिळाले. तसेच काही ठैकेदारांना वाजवीपेक्षा जास्तीचे कामे गेलेली आहे ते काही कामे सुरू करतात काही तशीच ठेवतात. या बाबतीत निर्णय घेत आहोत की एकादा ठेकेदार ५० लक्ष पर्यतचीच कामे करू शकत असेल तर त्यास ५० लक्ष पेक्षा जास्त कामे जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल. दुसरा प्रश्न असा की मागिल वर्षी बजेट मधे कामे होती ती झाली नाही व स्पील ओव्हरमधेही आले नाही त्याचे कारण असे की, मागिल वर्षी जे ७२ कोटीची कामे ठेवलेली होती त्यापैकी ६० कोटीची कामे अंदाजपत्रक तयार करून वर्क ऑर्डरही दिलेल्या आहे.उर्वरीत जी १२ कोटीची कामे आहे बजेट मधे असूनही प्राधान्यक्रम दिला गेला नाही म्हणून त्यांचे अंदाजपत्रकही तयार केले नव्हते व टेंडर प्रोसेसही केले नव्हते.ही कामे करावयाची असेल तर नव्याचे यात बजेटमधे समावेश करून घ्यावी लागेल. स्पील ओव्हरमधे ही तीच कामे गेलेली आहे की ज्यांचे अंदाजपत्रक होवून पूढील कार्यवाही झालेली आहे. जरी २५ ते २६ कोटीची स्पील ओव्हरची कामे आहे तरी या वर्षीच्या खर्चातून त्यावर फक्त १५ कोटीचा खर्च पडणार आहे. मागिल वर्षी २० कोटीची स्पील ओव्हर मधील कामे व नवीन कामे ५० कोटी असे एकूण ७२ कोटीची कामे होती त्यापैकी २० कोटीची स्पील ओव्हरची व नवीन कामातील ४० कोटीचे सुरू केलेली आहे. २६ कोटीची स्पील ओव्हरची कामामधे ११ ते १२ कोटी रूपये हे बजेटमधील खर्च होणार आहे. या वर्षात १५ कोटीच स्पीलओव्हर खर्च होणार आहे. दर वर्षी ५ कोटी कमी कमी करून स्पील ओव्हरची कामे कमी करावी लागणार आहे. तिसरे असे की ऑगस्ट मधे बजेट मंजूरीसाठी ठेवले होते. एकूण वसूली डिमांड ही १०० कोटी होते त्या पैकी ७० टक्के वसूली होईल असा शब्द दिला होता. जेव्हा वसूली करावयाची कार्यवाही केली असता जी डिमांड होती ती जास्तीची होती. १०० कोटीची नसून ७३ ते ७४ कोटीचीच आहे. न्यायालयात काही प्रकरणे आहे ते वगळले तर ५६ ते ५७ कोटीचीच डिमांड आहे त्यापैकी ३१ कोटी वसूल करण्यात आले. जवळपास ५० टक्के वसूल झाले ही वसूली करण्यासाठी अधिकारी कर्मचारी यांनी फारच प्रयत्न केले. ५६ कोटी वसूल करावयास पाहिजे परंतू ते होवू शकले नाही यापूढेही वसूली मोहिम चालू राहणार आहे व उर्वरीत वसूली करणार आहोत. या वर्षीही पाणीपट्टी व मालमत्ता कराची वसूली ही ६० कोटीची करू असे प्रस्तावित होते परंतू स्थायी समितीने आणखी ६ ते ७ कोटी वाढ्वून दिले आहे. वसुलीसाठी मनापासून अधिकारी प्रयत्न करतील तसेच जशी वसूली होईल त्याप्रमाणे कामाचे अंदाजपत्रक तयार होवून विकास कामे होतील. १५ कोटी जे काही सिडकोसाठी मिळत आहे त्यातील ७.५० कोटीची

कामे ही नगरसेवकाच्या मागणीनूसार व ७.५० कोटीची कामे ही पूर्ण सिडकोतील मोठमोठी विकास कामे करण्यासाठी खर्च करणार आहोत. मी सर्व सिडकोतील नगरसेवकांना विनंती केली होती १० लक्ष पर्यती जी जी कामे असतील ती आपण सजेस्ट करावी. ती कामे घेता येतील. परंतू बजेट मध्ये देतांना असे दिले होती १५ कोटी ही सिडकोसाठी विकास कामे असे दिले होते. एकच हेड ठेवले होते. परंतू स. सदस्यांनी जी १० लक्षची कामे दिले होते ते बजेटमधे आले नाही. जी १० लक्षची कामे दिलेली होती त्यांचे अंदाजपत्रक तयार आहे परंतू टेंडर काढू शकत नाही कारण बजेटमधे आले नाही. बजेटमधे रिप्लेस करून दिले, दुसऱ्या कामाचे टेंडर दोन दिवसामधे काढू शकतो. तसेच सिडकोसाठी रेग्यूलर कामासाठी २ ते २.५० कोटी खर्च अपेक्षीत आहे. तसेच पाणीपूरवठयासाठी आणखी २ कोटीची तरतूद करावी लागेल. बजेट मंजूर करतांना ४ ते ४.५० कोटी मा.महापौरांनी तरतूद करून दयावी. मागिल वर्षी ३१ कोटी वसूली केलेली आहे. या वर्षी किमान ४५-५० कोटी कराच्या माध्यमातून वसूली होईल. सिडको भागातील कर कशा प्रकारे वसूल करायचा त्या बाबत प्रस्ताव ठेवणार होतो तो कर तसेच जे ७० कोटीचे टारगेट दिले आहे ते वसूल करण्याचा आम्ही मनापासून प्रयत्न करू.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: टारगेट दिल्यानूसार वसूली होत नाही परंतू प्रशासकीय खर्च हा बजेट मंजूर केल्यानूसार होतो. २५ टक्केही टारगेट नूसार वसूली होत नाही. ४० टक्के विकास कामावर खर्च व ५३ टक्के प्रशासकीय खर्च होतो प्रशासन दिशाभूल करीत आहे. वसूली पूर्ण होत नाही विकास कामासाठी रक्क्म राहत नाही म्हणून स्पील ओव्हरमधे कामे जातात.

मा. आयुक्त :बजेट वाढण्याचे कारण असे होते की ३३ कोटीचे कर्ज घेणार व ते परतफेड करणार. खर्चाची एकच इन्ट्री झाली म्हणून २३५ वर बजेट गेले.परंतू शासनाने यास मान्यता दिलेली नाही. २८ कोटी कर्ज घेवू शकलो ३४ कोटी परत करू शकलो. जे आकडे वाढले होते त्यात ३०ते ३५ कोटी हेच होते. परंतू या वर्षी असे माहित नव्हते की शासनाची ३१ मार्च पर्यत मंजूरी मिळेल.परंतू शासनाची मान्यता मिळाली चेक दिला म्हणून ३३ कोटीने कमी झाले. ज्यावेळी स्थायी समितीने बजेट मंजूर केले त्यावेळी किती पैसे शासनाकडे दयायचे हे आले नव्हते त्यानंतर ऑर्डर आले की ३४ कोटी दयावे नंतर ७ कोटी दयावे २९ मार्च ऑर्डर आली होती. त्यावेळी प्रशासनाचे बजेट तसेच स्थायी समितीचे बजेट मान्यता झालेली होती.जे ३४ कोटी दिले ते आता रिवाईज बजेटमध्ये येईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:रिवाईज बजेट हे तीन महिण्यापूर्वी दयावयास पाहिजे होते ते का दिले नाही. मागिल वर्षाचे रिवाईज बजेट आज ठेवले आहे. हे बरोबर नाही. पारदर्शकता ठेवली जावी अशी विनंती आहे.

मा. आयुक्त :जानेवारी फेब्रुवारीमध्ये देणार होतो परंतू या महापालिकेत रिवाईज बजेट व रेग्यूलर बजेट बरोबर देण्याची पध्दत आहे म्हणून दिले.आपला जो प्रश्न आहे २० कोटीचा मागील वर्षीही असेच झाले ७० कोटीचे नियोजन केले. परंतू तितकी आवक झाली नाही.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय: बीओटीस आपण मान्यता देणार आहे आम्ही काही करू शकत नाही. सभागृह त्यास मंजूरी देईल परंतू प्रशासनच जबाबदार राहील. हा विचार करून प्रशासनाने पारदर्शकता ठेवून काम करावे.ते करणे योग्य की अयोग्य हे प्रशासनाचे बघण्याचे काम आहे. किती कोटीची मालमत्ता आहे व किती उत्पन्न मिळणार आहे. याचा प्रशासनाने विचार करावा.

मा.आयुक्त : बीओटीचे प्रपोजल स्थायी समितीची मान्यतेनंतर या सभागृहासमोर येईल. मी त्यावर सही केली आहे .परंतु या सभागृहाने मान्य केल्यास सभागृहही जबाबदार राहिल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:सभागृह मान्य करेल व प्रशासन कार्यवाही करेल. चूका झाल्यातर सभागृहाला जबाबदार धरतील. काही सदस्यांना आज दोषी ठरवले व त्यांना खेटया माराव्या लागतात.

मा. आयुक्त :जी कार्यवाही स. सदस्यांवर झाली.सदर ठराव हा अशासकीय होता प्रशासनाने ठेवलेला नव्हता.

डॉ. भागवत कराड :काही सदस्यांवर कार्यवाही झाली. एका वकीलाकडून सल्ला घेतला त्यांनी सांगितले कार्यवाही क्रणे बरोबर आहे. दुसऱ्या वकीलकडून सल्ला घेतला त्यांनी कार्यवाही करणे योग्य नाही. तर ज्यांनी कार्यवाही करणे योग्य नाही असा सल्ला दिला तर ज्या वकीलांच्या सल्ल्यानूसार कार्यवाही केली त्यांचेवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. त्यांचेवरही कार्यवाही झाली पाहिजे.

श्री.मुजीब खान : सन २००५-२००६ चे सुधारीत अर्थसंकल्पावर बरीच चर्चा झालेली आहे मान्यता दयावी.

मा.महापौर :सन २००५-०६ चे सुधारीत अर्थसंकल्पास दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: स्लम भागासाठी नियमानूसार बजेटच्या ५ टक्के रक्कम तरतूद करावी .

डॉ. भागवत कराड :या अर्थसंकल्पास मंजूरी दयावी मंजूरी देत असतांना अर्थसंकल्पात काही सदस्यांना वार्डातील कमी कामे आलेली असतील.ती समावेश करण्यात यावी याचे अधिकार सभागृहाच्या वतीने आपणास असतील. सिडको भागातील पाणीपूरवठयात सूधारणा करून अर्थसंकल्पास मंजूरी देण्यात यावी.

मा. महापौर :महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी काय उपाययोजना केली पाहिजे त्या संबधी सुचवावे. पाणीपूरवठयासाठी खर्च येणार आहे. किती खर्च येणार किती वाढविणार आहे यावर चर्चा करावी.

श्री. मुजीब खान : शहरात ३८ हजार नळ कनेक्शन अनधिकृत असतील. ते अधिकृत करावे. अधिकृत केल्यास १.५० कोटीचे उत्पन्न जवळपास मिळेल.

श्री. अ.रशिद खान : पान एम-१८ वर जे कराच्या बाबतीत दाखवले . त्यामधे मोठया इमारतीवर जे की १५०० स्क्वेअर फुट पेक्षा जास्त बांधकाम असेल तर २ टक्के कर घेतो.कमी कर आहे. शासनास कर दयावा लागतो. त्या बाबतीत विचार करावा. चालू पाणीपट्टी २१कोटी रू पये व नवीन दरानूसार ३२ कोटी रूपये उत्पन्न दाखविण्यात येत आहे. जे अनधिकृत नळ कनेक्शन आहे ते रेग्यूलर केल्यास ती वाढ होईल.जी वाढ दाखवली ती रूपये २९०० प्रमाणे की १८००रूपये प्रमाणे दाखविले. स्थायी समितीने पाणीपट्टीत कोणतीही वाढ केलेली नाही तर अपेक्षीत उत्पन्न ३२ कोटी कसे दाखवले. याचा खूलासा घ्यावा.

कार्य. अभियंता(पापू) :स्थायी समिती सभेत पाणी पट्टी वाढीचा प्रस्ताव दिलेला होता परंतू पाणीपट्टीत वाढ केलेली नाही.व२९०० रूपये प्रमाणे होणारी वाढ यात समावेश केलेली नाही.

श्री. वसंत नरवडे :पाणीपूरवठयाचा खर्च हा चार चार हेडमधे दुरुस्तीच्या नावाखाली समाविष्ट केला. एकाच हेडखाली दुरूस्तीच्या नावाखली का घेतले जात नाही.

श्री. अ. रशिद खान :पाणीचे उत्पन्न कशाच्या माध्यमातून वाढविणार आहोत याचा खूलासा व्हावा.

मा.आयुक्त :२१ कोटीची जी सध्याची डिमांड आहे ती १८०० रूपये धरून आहे. २९०० रूपये प्रमाणे करावे म्हणून प्रस्ताव दिला होता परंतू स्थायी समितीने मान्य केले नाही व चांगल्या प्रकारे वसूली करून ३२ कोटीचे टारगेट दिले आहे. प्रशासन

मनापासून वसूली करण्याचे प्रयत्न करेल. परंतू नाही वसूल झाले तर ही तूट कोठून भरून काढणार असा प्रश्न होता.

श्री.अ.रशिद खान पान क्र.एम ३० वर बीओटीच्या माध्यमातून १.०० कोटी उत्पन्न अपेक्षीत धरले आहे ते जास्त करावे ३.५० कोटी गृहीत धरावे.

मा. महापौर : यात आणखी २ कोटीची वाढ करण्यात येते ४ कोटी करण्यात येते.

श्री. अ. रशिद खान :पान क्र ४३ वर अग्निशमन विभागासाठी १.०० ची तरतूद गाडी व इतर साहित्य यासाठी केलेली आहे. गाडी घेणार की ऑफिस साहित्य याचा खूलासा होणे आवशक आहे.

मा.आयुक्त :एक प्रपोजल केलेले आहे. १० कोटीची मागणी केलेली आहे.

श्री.अ.रशिद खान :पान क्र एन ४७ वर उद्यानास मागिल वर्षात १९.१५ लक्ष नागरीकांनी भेटी दिल्या असे आहे परंतू संगित कारजेंचा आनंद लुटणारे नागरीक फक्त ८००० मनूद केले. याचा अर्थ दररोज २० लोक येत होते. २० लोकांचे पैसे जमा करणारे कर्मचारी यांचा पगार जास्त असेल.हे बरोबर वाटत नाही. पान क्र. आर १ मध्ये सन २००५-०६ चे कराचे उत्पन्न ३१ कोटी होते आता १८ कोटी करण्यात आले. पान क्र आर ६ मध्ये फायर कॉल चार्जेस ५० हजार तरतूद केली

मा. महापौर :जे आकडे दिले ते बरोबर आहे आणखी रक्कम वाढवायची असेल तर वाढवू.

श्री. अ.रशिद खान :आर १६ मधे नागरी घन कचरा प्रकल्प साहित्य खरेदीसाठी कर्ज ४.५० कोटी नमूद केले. यामधेच क्र ३ वर मोठे निवासी कर ७३लक्ष होते आता ४०लक्ष करण्यात आले.पान क्र.४८ वर खर्च निल दाखवले. निल असेल तर खर्च कशासाठी दिला.एम-१ वर ३१ कोटीच दाखविले सिडको महापालिकेडे हस्तांतर झाले ३५ कोटी करावे. पान क्र एम -३ वर दुकान भाडे जे दिले त्यात वाढ करावी. तसेच क्र ८ वर जाहिराती बोर्ड (होर्डीग्ज)मधेही तरतूद कमी आहे ती वाढविण्यात यावी. तसेच स्कूटर सायकल थांबे यातील तरतूदीत वाढ करावी.तसेच एम-१६ वर शासन शिक्षण कर थकबाकी २.७५ कोटी असून स्थायी समितीने सूचवलेली तरतूद ३.४० कोटी आहे. हे बरोबर आहे काय .थकबाकी प्रशासनास माहित असते की स्थायी समितीला. तसेच पान क्र एम-२२ वर जकात, अस्थापना खर्च पूर्वी १.७५ कोटी होता या वर्षीही जकात खाजगीकरण झाले तरी ही १.७५ कोटीच ठेवले कमी करावे. जशाच्या तसे ठेवलेले आहे. ज्या नाल्यावर इमारती आहे त्याचे करारनामा मूदत संपलेली आहे. त्याचे करामूळे उत्पन्नात वाढ होवू शकते वाढीची तरतूद करावी. तसेच सिडको महानगरपालिकेकडे आलेले आहे. सिडको भागाकडून येणारा कर मिळणार आहे. मालमत्ता करामध्ये वाढ करण्यात यावी.

श्री.मुजीब खान :जो भाग गुंठेवारीत येत आहे त्यास अधिकृत करीत आहेत तर कोणकोणता भाग गुठेवारीत येत आहे. तसेच अनधिकृत नळ सख्या किती आहेत याचा खुलासा घेण्यात यावा.

कार्य. अभियंता(पापू) :अनधिकृत नळ कनेक्शन अंदाजे २० हजार असतील.

श्री. मुजीब खान :स्थायी समिती सभेत अधिकारी यांनी ३८हजार अनधिकृत नळ कनेक्शन आहे असे म्हटले होते आता२०हजार असतील असे सांगतात चूकीची माहिती देत आहे

कार्य.अभियंता,(पापू.) :सर्वे केलेला होता त्यानंतरच आकडेवारी काढलेली आहे.

श्री. मुजीब खान :प्रभाग कार्यालय क मध्येच २० हजार अनधिकृत नळ कनेक्शन असतील असे मी म्हटले होते तर त्यावर अधिकारी यांनी असे उत्तर दिले की एकूण ३८ हजारच्या आसपास अनधिकृत नळ कनेक्शन असतील.अधिकारी यांना अनधिकृत नळ

कनेक्शन किती व कोणत्या भागात आहे हेच माहित नाही. ३८ हजार नळ कनेक्शन रेग्यूलर केले तर जवळपास १ कोटी रूपये त्या माध्यमातून महापालिकेस मिळू शकेल. बाबा पेट्रोल पंप ते चिकलठाणा पर्यत मोठमोठया हॉटेल व इमारतीमधे मुख्य जलवाहिनीवरून एक दोन इंची नळ कनेक्शन घेतलेले असून २४ तास पाणी राहते.परंतू हे लोक फक्त अर्धा इंची नळाचे पाणीपट्टी भरतात. अधिकारी यांना हे सर्व माहिती आहे. सहा महिण्यापूर्वीच मी स्थायी समितीमधे हा प्रश्न उपस्थित केला होता. परंतू कार्यवाही होत नाही.

श्री. देसरडा प्रशांत :बायोमेडीकल वेस्ट चे सभासद ५०० केलेले आहे व या वर्षी २ हजार सभासद होणार असे नमूद केले आहे. आणि व्यावसायिक नळ कनेक्शन ८८३ दाखविण्यात आले. या शहरात डॉक्टर सभासद संख्या ३ हजार होणार हे प्रशासन कबूल करते परंतू नळ संख्या ८८३ दाखविण्यात येते हे कसे. यात हॉटेल व्यावसायकि नाही इतर व्यावसायीक नाही कंपन्याचे नाही तरी कमी नळ संख्या का दाखविण्यात आलेली आहे. म्हणून स. सदस्य श्री.मुजीब खान यांनी जे प्रश्न उपस्थित केला त्याची दखल घेतली पाहिजे.२० हजार कनेक्शन अनधिकृत आहे प्रशासन कबूल करते,ही गंभीर बाब असून अभययोजना राबवून हे सर्व नळ कनेक्शन एक महिण्यात अधिकृत करावे.जेणे करून उत्पन्न वाढेल तसेच वसूलीसाठी नवीन एक उपआयुक्त पद निर्माण करावे अशी विनंती आहे.

मा. महापौर :सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेले असल्यामूळे १६५ पदांना मंजूरी देणार आहोत. येत्या १३ तारखेच्या बैठकीत प्रशासनाने उप आयुक्तांचे एक पद मंजूरीसाठी प्रस्ताव ठेवावा. त्यास मान्यता दिली जाईल.प्रशासनाने या पदास मंजूरीसाठी शासनाकडे मागणी करावी.

श्री. संतोष खेंडके :पूंडलिकनगर भागात पाणी देण्या बाबत प्रशासन नुसते एक वर्षापासून आश्वासन देत आहे परंतू कार्यवाही होत नाही. त्या भागात बऱ्याच ठिकाणी पाईपलाईन टाकली गेली नाही. या संबधी ठोस निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात यावा.

श्री. वसंत नरवडे :या शहरात पाणीप्रश्न व पाणीपूरवठयाच्या उत्पन्ना बाबत चर्चा होत आहे. बजेटमधे व्यावसायीक नळ कनेक्शन अर्धा इंची ५२१ तर पाऊन इंची १६४ दाखविण्यात आले आहे. तर एक इंची १४४ व्यावसायिक नळ कनेक्शन आहे. असे नमूद केले. या शहरात अर्पाटमेंन्ट किती झालेल्या आहेत याची नोद व तेथे किती इंची नळ कनेक्शन दिले याची नोंद ठेवली तर महानगरपालिकेच्या उत्पनात जरूर वाढ होईल. याकडे लक्ष दिले जात नाही व जे पाणीपट्टी भरतात त्यांना कर लादला जातो. ज्या इमारती असतील दवाखाने असतील त्यांना घरगुती नळ कनेक्शन देतांना जास्त इंचीचे दिले तर जे अर्धा इंची कनेक्शन असलेल्या पाणीपूरवठयावर त्यांचा परीणाम होतो. त्यांना पाणी मिळत नाही व त्यांना अशा परीस्थितीत १८०० रूपये कर भरावा लागतो. बजेटमधे अपार्टमेंन्टला किती इंची नळ कनेक्शन दिले.हॉटेल किती, इतर व्यावसायीक व कंपन्या किती आहे याची नोंद दिसून येत नाही.जे फेरीवाले असतील त्यांचेकडून मालमत्ता कर ५०० रू. घेतला जातो परंतू त्या व्यावसायीकडून महानगरपालिकेचे पाणी घेत असतील तर त्यांचेकडूनही उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने पाण्यावर कर लावला गेला पाहिजे.

मा. महापौर :जे अनधिकृत नळ कनेक्शन असतील ते तीन महिण्यात रेग्यूलाईज करावे. त्यामूळे पाणीपट्टी उत्पन्नात वाढ होईल. व व्यावसायीक नळ कनेक्शन कमी दाखवलेले आहे. पून्हा सर्वे करून जर व्यावसायीक नळ कनेक्शन म्हणून वापर होत असेल व घरगूती वापर दाखवत असतील त्यांचेकडून त्याप्रमाणे वसूल करावे.

श्री. मुजीब खान :स्पील ओव्हरची जी कामे आहेत ती तातडीने करण्याचे आदेश करावे व जे कामाचा उल्लेख केलेला आहे ती व इतर राहिलेल्या कामाचा समोवश करून हे बजेट मंजूर करावे.

सौ.लता दलाल :०.५ प्रमाणे कपांऊडींग चार्जेस घेण्या बाबत ठराव पारीत केलेला आहे. त्याचे उत्पन्न या बजेट मध्ये कुठेही दाखविण्यात आलेले नाही. ३ कोटी रूपये मिळू शकते. तसा उल्लेख करण्यात यावा.

श्री.नरवडे वसंत :शहरातील अनधिकृत होर्डींग्ज किती आहे त्यांना नोटीसा देवून कार्यवाही करावी. त्यापासून जवळपास १ कोटीचे उत्पन्न येवू शकेल. होर्डींग्ज चार्जेस हे आकारले गेलेच पाहिजे.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : होर्डींग्ज लावण्या बाबत महानगरपालिकेने धोरण ठरवावे. शहरात रस्त्याचे दोन्ही बाजूने होर्डींग्ज दिसतील. त्यावर महानगरपालिका ताबा असावा. चार्जेस वाढवावे. मोठमोठे डिजीटल लावण्यात आलेले आहे. चौकाचे सौदयीकरण केलेले आहे हे शहर ऐतिहासिक शहर आहे याचा विचार करावा.त्यासाठी महानगरपालिकेने जनतेसाठी आचारसंहिता तयार करावी व त्याची अमलबजावणी व्हावी. जे. अनेक ठिकाणी अनधिकृत नळ कनेक्शन असतील ते कन्सेशन रेटनूसार रेग्यूलाईज करण्यात यावे. जेणे करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल व या बजेटला मान्यता देण्यात यावी.

श्री. बन्सीधर गांगवे :शहरात महानगरपालिकेच्या हद्यीत अनेक ठिकाणी पेट्रोल पंप असून त्या पेट्रोल पंप चालकांनी अग्निशमन दलाचे ना हरकत प्रमाण पत्र घेतलेले नाही त्या घेण्यास भाग पाडावे. यातून महापालिकेला उत्पन्न प्राप्त होईल.व यास कमर्शियल टॅक्स आकारणी करण्यात यावी.

सौ. पुष्पा शिंदे :पुडंलिकनगर भागात पाण्याचे जलकुंभ बांधलेले असून पूंडलिकनगर व इतर बाजूच्या प्रभागात २७ तारखेला पाणी देणार होते का दिलेले नाही याचा खूलासा व्हावा.तसेच१३वी स्कीमसाठी जी जलवाहिनी जाते त्यातून अनधिकृत नळ कनेक्शन घेतलेले आहे ते अधिकृत करण्यात यावे.त्यामूळे महापालिकेस उत्पन्न मिळेल.

मा. महापौर :अनधिकृत नळ कनेक्शन संदर्भात निर्णय दिलेला आहे. इतर विषयावर बोलावे.

सौ. विजया रहाटकर :मा. सभापती स्थायी समिती याची अतिशय चांगला अर्थसंकल्प आपल्या समोर मंजूरीसाठी ठेवलेला आहे.१०० टक्के वसूलीचे उद्दिष्ट साध्य करू शकलो नाही परंतू प्रयत्न केलेले आहे ही सूध्दा अतिशय अभिनंदनीय बाब आहे.अनेक सदस्यांचे वार्डातील कामे आलेली नसतील ती यात घ्यावी मागिल वेळी आम्ही सदस्य होतो. अनेक कामे मार्गी लागली होती ही वस्तुस्थिती आहे. वसुलीसाठी प्रशासनाने मनापासून प्रयत्न केलेले असून प्रशासनाचे सर्वाच्या वतीने अभिनंदन करते. असेच प्रयत्न वसूलीसाठी करावे सभागृह प्रशासनाबरोबर आहे. अनेक निर्णय अर्थसंकल्पात घेतलेले आहे. यात प्रभाग कार्यालय निहाय ३२ कोटीची विकास कामासाठी तरतूद केलेली आहे. ही तरतूद वसूलीच्या प्रमाणाकानूसार केलेली आहे. परंतू ज्या वार्डाची वसूली जास्त आहे त्या वार्डात त्या त्या प्रमाणानुसार विकास कामासाठी तरतूद करणे योग्य होईल. अनेक वार्डात १०० टक्के वसूली होते. तर अशा वार्डात विकास कामे सूध्दा १०० टक्के झाली पाहिजे.

श्री.तरविंदरसिंग धिल्लन: भूसंपादनासाठी ४ कोटीची तरतूद आहे ती वाढविण्यात यावी तसेच ज्या सदस्यांच्या वार्डातील कामे आलेली नसतील त्यांची यांदी आपल्याकडे घ्यावी व

आपणास सर्वांच्या वतीने अधिकार देण्यास सम्मती आहे. व या अर्थसंकल्पास मान्यता दयावी अशी विनंती आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:दुर्बल घटकासाठी ५ टक्के तसेच स्लम भागासाठी १५ टक्के रक्कम तरतूद करावी व जे जे कामे यात आलेली नसतील ती समाविष्ट करून या बजेटला मान्यता दयावी.

डॉ.भागवत कराड :अर्धा इंची नळ कनेक्शनसाठी प्रशासनाने २९००रू. दर प्रस्तावित केला आहे. स्थायी समितीने १८०० रू पाणीपट्टी ही कायम ठेवून त्यास मान्यता दिलेली आहे. पाणीपट्टीत कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येवू नये.

मा. महापौर :पाणीपट्टीत कुठलीही वाढ करण्यात येणार नाही.

श्री. अ. रशिद खान :माजी सैनिकांना त्याचे एका मालमत्ता करामधे किमान ५० टक्के सूट देण्यात यावी. शासनाचा जी. आर. तशी दुरूस्ती करावी.

श्रीमती किवळेकर जयश्री :मा. सभापती यांनी २४ वा अर्थसंकल्प २८७कोटी ७८ लक्ष ७५ हजार रक्कमेचा सन २००६-०७ चा अर्थसंकल्प आपल्या समोर ठेवला आहे.मा. सभापती यांनी जनतेवर कुठल्याही प्रकाराचा बोजा न टाकता अर्थसंकल्प सादर केलेला आहे. यात पाणीपट्टीची वाढही केलेली नाही. ही आनंदाची बाब आहे. उच्च प्रतिची सेवा सूविधा देण्याची काळजी घेतली आहे. दहा महिण्याच्या काळात दोन अर्थसकल्पात जनतेला अधिक दिलासा व शहराच्या विकासाला गती देत जनतेच्या हिताचे व संरक्षणाचे भान ठेवत चांगल्या पध्दतीने अर्थसंकल्प सादर केलेला आहे. मा. सभापती यांचे कार्यकाळात अनेक निर्णयात्मक कामे झालीत. त्यात जकातीचे खाजगीकरण शहर बस सेवा सुरू झाली. नागरीकांना यामूळे दिलासा मिळाला. तसेच गुंठेवारी , डिफर पेमेंट, शहर सौदर्यीकरण शहर पर्यटन तसेच बीओटी तत्वावर विकास कामे,तसेच विकास कामासाठी ११९ कोटीची तरतूद ठेवलेली आहे. सिडको हस्तांतरणाचा प्रश्न सूटलेला असून सिडको भागासाठी महानगरपालिकेच्या हिताला कूठेही झळ न पोहचता १५ कोटीची तरतूद विकास कामासाठी व २५ कोटीची रक्कम महानगरपालिकेच्या तिजोरीत आलेली आहे. व एक प्रकारचा महानगरपालिकेचा आर्थिक कणा मजबूत झालेला आहे.सिडको भागात गरवारे मध्ये जलतरण तलावसाठी १.०० , बॉटनिकल गार्डनसाठी तसेच सलीम अली सरोवर साठी तरतूद करून जनतेला एक प्रकारचा दिलासा दिलेला आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे औरंगाबाद हट योजना हया योजनेमूळे शहर उजळून निघणार असून ऐतिहासीक शहरास नव्याने नाव लौकिक प्राप्त होणार आहे. तसेच प्रभाग समितीचे कार्य अधिक जोमाने व्हावे व कामाचे विकेद्रीकरण व्हावे व त्या दृष्टीने तातडीने कामे व्हावीत म्हणून ३२ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. असा अर्थपूर्ण अर्थसंकल्पाचा ठेवा आज सभागृहापूढे ठेवलेला आहे त्याचे मी अभिनंदन करते व या अर्थसंकल्पास मान्यता दयावी . उपलब्ध निधी व विकासाची दृष्टी याची सांगड घालून केलेला अर्थसंकल्प निश्चितच अर्थपूर्ण आहे. त्यांचे काळात त्यांचे सहकारी सदस्य व प्रशासन यांचेही अभिनंदन करते विशेष म्हणजे वसुलीची विक्रमी वाढ व त्यासाठी केलेली मेहनत हे ही उल्लेखनीय आहे म्हणजे प्रशासनाने मनावर घेतले तर काहीच अशक्य नाही हे सिध्द होते त्यासाठी मा. आयुक्त व उपआयुक्त व प्रशासनातील संबधीत अधिकारी यांचे कामगिरी बध्दल मी अभिनंदन करते. आमच्या प्रभागामध्ये कोटयावधीच्या ओपनस्पेस आहेत त्यांचे संरक्षीत भिंतीसाठी यात तरतूद नाही. १० लक्षची तरतूद ठेवावी.

डॉ. भागवत कराड :सभागृहात अर्थसकल्पावर बरीच चर्चा झालेली असून काही स. सदस्यांच्या वार्डातील कामे यात आलेली नाही तसे पत्र आपल्याकडे आलेले आहे. या बजेटमधे सर्वांच्या वतीने मा. महापौर यांना अधिकार देवून व स. सदस्यांच्या विनंती पत्रास मान देवून हा अर्थसंकल्प मंजूर करण्यात यावा. मा. सभापती यांनी चांगला अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्यांचा अभिनंदनाचा ठराव पण घेण्यात यावा.

श्री. बन्सीधर गांगवे :वार्ड क्र ७४ हा सिडको भागात येत असतांना मी पत्र देवून सुध्दा या वार्डातील एकही काम यामधे घेतलेले नाही. गेल्या १५ वर्षापूर्वी सिडकोने संघर्षनगर येथे जलवाहीनी टाकलेली होती. ती बदलण्यात यावी.

सौ. कला बोरमणीकर :शहर सौदर्यीकरणाचा निधी कमी करून पाणीपूरवठयासाठी जास्तीत जास्त खर्च करावा .

मा.महापौर :सर्व सदस्यांना अशी सूचना करतो की आपण जे दुरूस्तीसह महापौरांना बजेट मंजूर करण्याचे अधिकार देत आहेत. ज्यांचे वार्डातील कामे आलेली नसेल त्या सदस्यांनी माझ्याकडे लेखी पत्र दयावे.प्रयत्न करून जेवढी कामे समावेश करता येतील तेवढी करू .१०० टक्के काम करण्याचा प्रयत्न करू.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर :नगरसेवकांचे मानधन १० हजार करण्यात यावे.

श्री. वसंत नरवडे :आरोग्य विभागामधे महानगरपालिकेच्या अनुदानीत कर्मचाऱ्यांना पगार देवून महानगरपालिकेचे गेल्या तीन चार वर्षात ४ कोटीचे नूकसान झाले त्यास त्या बाबतीत खूलासा करावा.

मा.आयुक्त :महानगरपालिकेकडे जे कुटूंब नियोजन व मलेरीयाचे जे काही पगार म्हणून अनुदान येते. पाच सहा वर्षापासून २ कोटीचे अनुदान वाढविले होते. परंतू त्यांनी जे सांगितले की शासनाचे जे काही रेटस् आहे त्या प्रमाणेच देणार. चार पाच वर्षापासून प्रश्न पडला होता. पूणे येथे काहींना पाठवून त्यांनी ३१ मार्च पूर्वी ३५ लक्ष रिलीज केले. चार कोटीपैकी १.५० ते २ कोटी पूणे हून मिळवू. परंतू वस्तूस्थिती आहे जास्त पगार दिला जातो. जो फरक येतो त्याप्रमाणे निधी मिळणार नाही.

श्री. नरवडे वसंत : जी कार्यवाही खालचे लिपीकापासून पगार वाढवून देण्याबाबत झाली व महानगरपालिकेचे नूकसान केले यास जबाबदार कोण संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही का होत नाही.

मा. महापौर :आज बजेटची बैठक असल्यामूळे यावर चर्चा करणे योग्य नाही. येत्या १३ तारखेच्या बैठकीत मा. आयुक्त यांनी सविस्तर माहिती सभागृहासमोर ठेवावी.

श्री. नरवडे वसंत : झालेली चूक निदर्शनास का आणून दिलेली नाही. महानगरपालिकेवर आर्थिक बोजा टाकला गेला यास जबाबदार कोण ?

श्री. कचरू मोरे :एकूण बजेटच्या ५ टक्के रक्कम जे काही कमकुवत घटकासाठी ठेवावयास पाहिजे होते ते ठेवलेले नाही. या शहरात ५३ झोपडपट्टया घोषित आहे. या भागात विकास कामासाठी भरघोस तरतूद करण्यात आलेली नाही. या भागात गरीब व कष्टकरी लोक राहतात. व ते शहर स्वच्छ ठेवतात. ५ टक्के ची तरतूद करण्यात आलेली नाही ती करावी.

मा.सभापती (स्था.स.) : सुधारीत व मूळ अर्थसंकल्पावर स. सदस्यांनी अभ्यासपूर्वक सूचना मांडलेल्या आहेत व काही सूचना केलेल्या आहेत. जकात खाजगीकरण करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवलेला होता. १०४ कोटीचे टारगेट ठेवले होते ते प्रशासनाच्या वतीने ठेवले होते. जेंव्हा ९८ कोटीची निविदा आली ती प्रशासनाचे स्थरावर फेर निविदा

काढण्यात आली व १०१.२५ कोटीची निविदा प्रशासनाच्या वतीने मान्य करण्यात आली. व जवळपास २२ ते २५ टक्के जकातीच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे. जेंव्हा स्थायी समितीसमोर निविदा आली त्यावेळी १५ स. सदस्य हजर होते. सर्वांनी त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. उत्पन्नात वाढ झालेली आहे व म्हणून च विकास होत आहे. बीओटीचा जो प्रश्न स. सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. जो शहराचा विकास खुंटलेला होता. या बाबतीत मा.महापौरांनी म्हटले होते की जर प्रशासनाच्या वतीने तसा प्रस्ताव आला तर कार्यवाही करू म्हणून प्रशासनाने एक कमेटी तयार केली व या माध्यमातून ४.५० कोटी रूपये दर वर्षाला भाडे मिळणार आहे. यावर सर्व नियंत्रण महानगरपालिकेचे राहणार आहे. व उत्पन्न महापालिकेस मिळणार आहे. आणी ही सर्व कार्यवाही करणार कायदेशीर अभ्यास करून प्रशासन व स्थायी समिती यांनी पालन केलेले आहे. म्हणून कोणतेही उद्दिष्ट हे वाढीव केलेले नाही. ठेवलेल्या बजेटचा स.सदस्यांनी मा.महापौरांनी या सर्वांनी आदर केलेला आहे.त्यामूळे मी सर्वाचा ऋणी आहे.व स.सदस्यांनी जो काही सल्ला दिला त्यांचा विचार करून या अर्थसंकल्पास एकमूखी मंजूरी झाली त्याबध्दल मी सभापती या नात्याने सर्वांना धन्यवाद देतो.आता मा. महापौर यांनी योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.कचरू मोरे :मा.सभापती यांनी झोपडपट्टी भागातील नागरीकांना सोयी सूविधा देण्या संदर्भात तरतूद केलेली नाही त्यांचेवर अन्याय केलेला आहे.

मा.महापौर :मा.सभापती स्यायी समिती यांनी स्थायी समितीच्या माध्यमातून चांगला अर्थसंकल्प या सभागृहासमोर मांडलेला आहे. ज्या भागातील कामे यात टाकायचे राहिले असतील त्या त्या सदस्यांनी माझ्याकडे त्यांची यादी दयावी. ती कामे यामध्ये समावेश करण्याचा प्रयत्न केला जाईल.या महानगरपालिकेचे महापौर पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर माझ्या काळातील हा दुसरा अर्थसंकल्प असून मला अतिशय आनंद होत आहे. हा अर्थसंकल्प जरी दुसरा असला तरी मागिल अर्थसंकल्प हा महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीमूळे आचारसंहितेमूळे पूरेसा वेळ मिळाला नव्हता. परंतु मला सांगताना आनंद होत आहे की हा अर्थसंकल्प मंजूर करतांना गत वर्षीच्या तुलनेत महानगरपालिकेच्या तिजारीत अवस्था निश्चितच चांगली आहे. मी माझया महापौराच्या कालावधीत पदाधिकारी स. सदस्य तसेच प्रशासन यांचे मतदतीने घेतलेले निर्णयाची अमलबाजवणी केली.पर्यायाने महानगरपालिकेच्या तिजोरीत भर पडली. सन २००५-२००६ च्या अर्थसंकल्पात जे वैशिष्टे होती ती जवळजवळ पूर्ण झालेली आहे त्यात गुंठेवारी कायदयानूसार अमलबजावणी करण्यासाठी अनेक वसाहतीचा सर्वेचे काम झालेले आहे. अनेक वसाहती अधिकृत करण्याचा मार्ग यामूळे मोकळा झाला आहे. महानगरपालिकेने बांधा वापरा व हस्तातरीत करा.बी.ओ.टी.तत्वावर विविध विकास कामाची प्रक्रिया पूर्ण केली असून पूढील काही दिवसात महापौर निवास स्थानाजवळ तसेच शहरात इतर ठिकाणी विकास झालेला दिसून येईल. शहरात प्रथमच मुंबई धर्तीवर मनोरजंन पार्क (Amuzment Park) अम्युझमेंट पार्क स्वामी विवेकानंद उद्यानालगत विकसीत करण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. एस्सेल वर्ल्ड (Essel World) धर्तीवर विकास होणार आहे. बांधकाम परवानगी देतांना भोगवटा प्रमाणपत्र घेतांना वाढीव कामासाठी बेसमेंन्ट कपाऊडींग चार्जेस प्रिमीयम रक्कम आकारणी करून बांधकाम नियमीत करण्यासाठी सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. महानगरपालिकेने एक खिडकी योजनेचा संकल्प केलेला

होता. व दिनांक १ मे २००६ पासून याची सूरूवात होणार असून एकाच ठिकाणी जनतेला परवाना प्रमाणपत्र ना हरकत प्रमाण पत्र उपलब्ध होईल. महानगरपालिकेने पर्यटनास चालना देण्यासाठी पर्यटन कक्षाची स्थापना केली असून अलीकडेच दिल्ली येथील स्कुल ऑफ प्लॅनींग अँड आर्किटेक्चर चे उच्च शिक्षण विदयार्थ्याकडून सर्वेक्षण झालेले आहे. मे-जून मध्ये त्यांचेकडून अहवाल प्राप्त होणार आहे. त्याचा निश्चित फायदा होईल व त्यासाठी अर्थसंकपात तरतूद ठेवण्यात आलेली आहे. पुंडलिकनगर येथील पाण्याचा ज्वलंत प्रश्न आहे. पूंडलिकनगर भागात असलेल्या टाकीत पाणी लवकरच म्हणजे जूलै च्या पहिल्या आठवडयात सोडण्यात येईल परंतू त्यासाठी सदर भाग गुंठेवारी झाला पाहिजे व गुंठेवारीत येण्यासाठी सर्व नागरीकांनी प्रयत्न करावे.या वर्षीच्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टये असे की, सिडको भागात जलतरण तलाव बांधणे, ऐतिहासीक कामाचे पून:रूज्ञीवन व परीसर सुशोभिकरण करणे.व त्याच बरोबर पर्यटन विकासासाठी जागा आहे. महानगरपालिकेच्या शाळांतील विदयार्थ्यी यांना बुट , सॉक्स व टाय देण्यासाठी तरतूद केली आहे. महानगरपालिकेकडे सिडकोचे हस्तांतरण झाले आहे. त्या भागात विविध सेवा सूविधा देण्यासाठी तरतूद करण्यात येत आहे. स्थायी समितीने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टयामधे खालील ठळक वैशिष्टे राहतील.

०१. राज्य सरकार कडून प्राप्त अनुदान रू.२५ कोटी व डिफरपेमेंटचे १० कोटी अशी एकत्र रू.३५ कोटीच्या निधीतून महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास योजना (I.R.D.P.) तयार करून शहरातील विविध रस्त्यांचा विकास करणे.

०२. महानगरपालिकेचा वीज खर्च कमी करण्यासाठी पर्याय शोधणे व वीज निर्मितीचा प्रकल्प उभारणे.

०३. सांडपाणी व जलनि:स्सारणाच्या पाण्यावर प्रक्रीया करून पाण्याचा पुन:वापर करणेसाठी प्रकल्प राबविणे.

०४. सिडको अधिसूचीत क्षेत्रासह वाढीव हद्दीसाठीची मंजूर विकास योजना सुधारीत करणे.

०५. हर्सूल येथे बी.ओ.टी.तत्वावर वॉटर पार्क व टुरिस्ट रिसॉर्ट विकसीत करणे.

०६. घनकचऱ्या पासून खत निर्मितीचा प्रकल्प उभारणे.

०७. सिडको कार्यालयाची महानगरपालिकेस हस्तांतर झालेल्या इमारतीत २४ तास चालू राहणारे जन्म-मृत्यु, स्मशान परवाना कार्यालय कार्यरत ठेवणे.

०८. माजी सैनिक किंवा त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या एका मालमत्तेवर मालमत्ता करामध्ये सामान्य करात १०० टक्के सुट देणे.

०९. सलीम अली सरोवर उद्यानाच्या सुधारणेसह अत्याधुनिक मत्सालयाची उभारणी करणे व बी.ओ.टी. तत्वावर विकासाचा प्रयत्न करणे.

१०. अखिल भारतीय स्तरावर महापौर चषक फुटबॉल स्पर्धा घेणे.

११. शहागंज भाजी मार्केट बी.ओ.टी. तत्वावर लोकोपयोगी कारणासाठी विकास करणे.

१२. प्राणी संग्रहालय स्थलांतर करणे.

१३. मध्यवर्ती जकात नाका परिसरातील महापालिकेच्या जागेत बी.ओ.टी. तत्वावर शॉपिंग सेंटर उभारणे.

१४. तारांगण उभारणी करणे.

१५. शहर एकात्मिक विकास रस्ते योजनेंतर्गत औरंगाबाद शहरातील महत्वाचे रस्त्यांचे रूंदीकरण करण्यासाठी भूसंपादन करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून भूसंपादनासाठी अतिरिक्त रू.१.०० कोटीची तरतूद करण्यात येवून एकत्रीत तरतूद रक्कम रू.५.०० कोटीतून खालील रस्त्यांचे भूसंपादनास प्राधान्य देण्यात येईल.

१) पैठण गेट ते बाराभाई ताजिया ५० फुट रूंद विकास योजना रस्त्याचे भूसंपादन.

२) पुनम लॉज गुलमंडी ते महात्मा फुले पुतळ्यापर्यंत ५०/६० फुट रूंद विकास योजना रस्त्याचे भूसंपादन.

३) जिल्हाधिकारी कार्यालयाचे चौकापासून ते शहागंज चमन पर्यंत ५० फुट रूंद रस्ता भूसंपादन.

४) लक्ष्मण चावडी जैन ट्रेडर्स ते कैलास स्मशान भूमी विकास योजना अंतर्गत रस्त्याचे भूसंपादन.

५) कैलास पेट्रोलपंप जालना रोड ते दादा कॉलनी १०० फुट रूंद विकास योजना अंतर्गत रस्त्याचे भूसंपादन.

६) गट नं.७०६ चिकलठाणा येथील एअरपोर्ट कर्मचाऱ्यांचे गृह निर्माण संस्थेच्या जागेतून जाणाऱ्या विकास योजना अंतर्गत रस्त्याचे भूसंपादन.

शहर विकासाठी महापौर या नात्याने मी घेतलेला निर्णयाची अमलबजावणी करण्यासाठी माझे सहकारी जे सर्व पदाधिकारी तसेच सर्व स.सदस्य व मा.आयुक्त, व इतर सर्व अधिकारी यासाठी सहकार्य करेल. व करतील याची मला खात्री आहे शहर विकासासाठी कोणतीही बाधा येणार नाही. शहराचा विकास हेच एकमेव ध्येय असेल. व सन २००६-२००७ हा अर्थसंकल्प दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे. हा अर्थसंकल्प मंजूर करतांना सर्वांनी सहकार्य केले त्या सर्वाचे मी अभिनंदन करतो. प्रस्तावित बदल खालीलप्रमाणे आहे.

**१) <u>जकात</u>**

सर्व सन्माननिय पदाधिकारी व प्रशासनामार्फत जकात कराची वसुली ही खाजगी अभिकर्त्यामार्फत सुरू करण्यात आलेली असुन स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार सन २००५-०६ या वर्षाकरिता जकात कर वसुलीचे सुधारित उद्दिष्ट रू. ८३.०० कोटीस मान्यता देण्यात येते. सन २००६-०७ या आर्थिक वर्षाकरिता रू.१०२.०० कोटीचे उद्दिष्ट निश्चित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**२) <u>मालमत्ता कर वसुली</u>**

सन २००५ - २००६ या आर्थिक वर्षाकरिता मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्टे रू. ४१.६८ कोटी निश्चित करण्यात आलेले होते. यामध्ये शासनाचे उपकरांचा समावेश आहे. दिनांक १ ऑगस्ट २००५ पासून आठ विभागीय कार्यालयांचे रूपांतर सहा वार्ड कार्यालयात करण्यात आलेले असून सुधारित अंदाजपत्रकात मालमत्ता कराची रू. २४.०० कोटीच्या सुधारित उद्दिष्टास स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार मान्यता देण्यात येते.

सन २००६-०७ या आर्थिक वर्षाकरिता मालमत्ता करापोटी रू.३२.०० कोटीचे उद्दिष्ट प्रशासनाकडुन निश्चित करण्यात आलेले

आहे. यामध्ये मालमत्ता सर्वेक्षणानुसार होणारी मालमत्ता करातील वाढ व सिडको वसाहतीकडून प्राप्त होणाऱ्या मालमत्ता कराचा विचार करून मालमत्ता कर वसुलीच्या उद्दिष्टात वाढ करून रू. ४१.५० कोटीचे उद्दिष्ट निश्चित करण्याची शिफारस स्थायी समितीने केली होते. यामध्ये सिडको हस्तांतरण, स्पेक सर्व्हे, शिवाजीनगरचा संभाव्य समावेशापासून प्राप्त होणारे उत्पन्न याचा विचार करून मालमत्ता कर वसुलीत रू. ४.६० कोटीचे वाढ करून एकुण रू.४६.०० कोटीचे मालमत्ता कराचे उद्दिष्ट देण्यात येते. प्रशासनाने उद्दिष्ट पूर्ती करावी.

३) **जमिन विकास शुल्क, शहर विकास निधी, बांधकाम परवाना, दंड**

स्थायी समितीने जमिन विकास शुल्क, शहर विकास निधी, बांधकाम परवाना, दंड निधीपोटी रू. ४.२३ कोटीच्या उद्दिष्टामध्ये सिडको भागाचा विचार करून रू. १.६२ कोटीची वाढ करून रू. ५.८५ कोटीच्या एकुण वाढीव उद्दिष्टास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

४) **दुकान भाडे, भाजी मंडई/आठवडी बाजार/नाट्यगृह भाडे/जाहिरात बोर्ड/होर्डिंग्ज**

स्थायी समितीने दुकान भाडे, भाजी मंडई/आठवडी बाजार/ नाट्यगृह भाडे/जाहिरात बोर्ड/ होर्डिंग्ज इत्यादी करिता रू. १.०६ कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. यामध्ये रू. १.६४ कोटीची वाढ करून रू. २.७० कोटीचे उद्दिष्ट सर्वानुमते निश्चित करण्यात येते. प्रशासनाने उद्दिष्टपूर्तीसाठी कार्यवाही करावी.

५) **कर वसुली प्रोत्साहनपर योजना**

महानगरपालिकेच्या प्रत्येक वार्ड कार्यालयास सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीसाठी अर्थसंकल्पात देण्यात आलेले उद्दिष्ट १००% पुर्ण केल्यास वार्ड कार्यालयातील कर्मचाऱ्यांना उद्दिष्टपुर्तीच्या १% रक्कम प्रोत्साहनपर बक्षिस स्वरूपात (Insentive) पदनिहाय वाटप करण्याच्या स्थायी समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

६) **पाणीपट्टी दरवाढ प्रस्ताव :**

कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी शहरातील नागरीकांना घरगुती, व्यावसायिक पाणी पट्टी दरात कर वाढीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाबाबत पाण्याचे उर्जा परिक्षण करणे बाबत सुचना देण्यात येते व कोणतीही दरवाढ न सुचविता पूढील कार्यवाहीस्तव सर्वसाधारण सभेसमोर पूढील मान्यतेसाठी शिफारस केली होती, स्थायी समितीने दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी प्रशासनाने तातडीने करावी, तसेच व्यावसायिक अवैध नळ कनेक्शन शोध मोहिम तातडीने हाती घेण्याचे निर्देश देण्यात येते व सर्वानुमते पाणीपट्टी दरवाढीचा प्रशासनाने सादर केलेला प्रस्तावामध्ये कोणत्याही स्वरूपाची दरवाढ सुचविण्यात येत नाही.

**७) पाणीपट्टी वसुली (शहर)**

स्थायी समितीने सन २००६-०७ मध्ये पाणीपट्टीपासून रू.३७.०० कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. यामध्ये नविन नळ जोडणी मागणी व शिवाजीनगरचा संभाव्य समावेश याचा विचार करता रू. १.०० कोटीची वाढ करून रू.३८.०० कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले जाते.

**८) अवैध नळ नियमित करणे**

औरंगाबाद महानगरपालिकेचा वाढता विस्तार व व्याप लक्षात घेता प्रशासनाकडे उपलब्ध असलेले घरगुती वापरासाठी असलेली नळ संख्या ८८४५० ही अत्यंत तोकडी असल्याचे सर्व सदस्यांचे मत झालेले आहे. महानगरपालिका हद्दीतील वसाहतीमध्ये घरगुती व व्यावसायिक वापरासाठी असलेले अवैध नळ कनेक्शन शोध मोहिम तातडीने हाती घेण्यात येऊन अवैध नळ नियमित करणे बाबत प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी व यामधून प्राप्त होणारे सुमारे रू. २.९५ कोटीचे अपेक्षित उत्पन्न गृहित धरून रू.३.०० कोटीचे उद्दिष्ट प्रशासनास देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**९ ) सेल्फ डेव्हलपमेन्ट स्किम राबविणे**

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात नविन बांधकाम करणाऱ्या गृह निर्माण संस्था, बिल्डर यांच्याकडून जमीन विकास शुल्क, शहर विकास निधी, विकास निधी शुल्क वसुल न करता कायद्याच्या चौकटीत राहून 'सेल्फ डेव्हलपमेन्ट स्किम'' या तत्वावर परवानगी देण्यात येईल. जेणेकरून महानगरपालिकेस सदरच्या क्षेत्रात विकास व देखभाल दुरूस्तीची कामे करण्याची आवश्यकता भासणार नाही. स्थायी समितीच्या सदरील प्रस्तावावर सर्वकष चर्चा होऊन 'सेल्फ डेव्हलपमेन्ट स्किम' या तत्वावर परवानगी देण्याच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**१० ) बी.ओ.टी. प्रकल्प**

औरंगाबाद महानगरपालिकेस बी.ओ.टी. प्रकल्पाच्या माध्यमातून स्थायी समितीने शिफारस केलेल्या रू. १.०० कोटीच्या उद्दिष्टात रू. ३.०० कोटीची वाढ करून रू.४.०० कोटीचे उद्दिष्ट देण्यात येते.

**१. प्रशासकीय खर्च**

स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार सन २००५ - २००६ या आर्थिक वर्षाच्या सुधारित एकुण रू. ५१.३१ कोटी च्या खर्चास मान्यता देण्यात येते. तसेच सन २००६-०७ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेचा अस्थापनेवरील खर्च रू.५६.४२ कोटी मध्ये काटकसरीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येते व स्थायी समितीच्या मान्यतेअंती नगर सचिव विभागाकरिता स्कॅन प्रिन्टर व संगणक खरेदीसाठी विशेष तरतुद उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

२. **वान्स्पत्युद्यान (Botonical Garden)**

सन २००६-०७ या आर्थिक वर्षात नविन वान्स्पत्युद्यान (Botonical Garden) सिडको एन-८ भागात उपलब्ध असलेल्या जागेवर उभारण्याकरिता स्थायी समितीने सादर केलेल्या प्रस्तावास सर्वकष चर्चा होऊन रू. १.०० कोटी ची तरतुद उपलब्ध करून देण्यात येते.

३. **पाणी पुरवठा तरतुदीअंतर्गत काटकसर**

प्रशासनाने सादर केलेल्या पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती व पंप देखभाल दुरूस्ती या लेखा शिर्षामध्ये , खर्चात काटकसर होण्याच्या दृष्टीकोनातुन प्रत्येकी रू. १.०० कोटीची कपात करण्याची शिफारस स्थायी समितीने केली होती, तथापि पाणी प्रश्न हा अत्यंत जिव्हाळ्याचा असल्यामुळे शहरातील नागरीकांना नियमित, सुरळीत पाणी पुरवठा होणे आवश्यक असल्याने देखभाल दुरूस्तीच्या खर्चात कोणतीही काटकसर न करता एस.टी.पी. प्लँटमधून रू.१.०० कोटी व महानगरपालिकेच्या वाढीव उत्पन्नातून रू.१.०० कोटी असे रू.२.०० कोटी सदर लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

४. **सिडको वसाहतीसाठी तरतुद**

शासन निर्णयानुसार १ एप्रील २००६ पासून सिडको भागाचे हस्तांतरण महानगरपालिकेकडे करण्याचा करारनामा झाला असून सिडको कार्यालयाकडून महापालिकेस रू.१५.०० कोटी इतकी रक्कम अनुदान स्वरूपात, सिडको प्रभागात विविध विकासाची कामे करण्यासाठी प्रदान करण्यात येणार आहे. वरील रू.१५.०० कोटीतून विविध विकासाची देखभाल दुरूस्तीची कामे करण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या रू.१५.०० कोटीच्या तरतुदीत रू.३.०० कोटीचे नविन कामांचा समावेश करून रू.१७.०० कोटीची तरतुद सिडको वासियांसाठी सर्वानुमते उपलब्ध करून देण्यात येते.

५. **शालेय विद्यार्थी विशेष कल्याण योजना**

औरंगाबाद महानगरपालिकेचे सर्व शाळेतील विद्यार्थी/ विद्यार्थीनींना बुट - मोजे, टाय गणवेषासोबत देण्याचे प्रस्तावास तसेच महानगरपालिकेतील सर्व शाळांमध्ये आग प्रतिरोधक यंत्रणा खरेदी व पाणी शुध्दीकरण यंत्रे खरेदी, विज्ञान साहित्य खरेदी करण्याचे याच बरोबर इयत्ता ४ थी ते ७ वी तील विद्यार्थ्यांना बाल चित्रपट दाखविणेसाठी स्थायी समितीने शिफारस केलेल्या रू. २५.०० लक्षच्या तरतुदीस सर्वानमुते मान्यता देण्यात येते.

६. **विकास निधी अंतर्गत विकास आराखडा अंमलबजावणीसाठी जमीन आणि इतर स्थावर मालमत्ता संपादन करणे**

शहर विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी रस्ते रूंदीकरण करणे करीता शहरातील विविध भागातील जमीन व इतर स्थावर मालमत्ता संपादन करणे व विकास कामे करणे, या करीता स्थायी समितीने शिफारस केलेल्या रू. ४.०० कोटीच्या तरतुदीमध्ये

रू.१.०० कोटीची वाढ करून व ठळक वैशिष्ट्यामध्ये दर्शविलेल्या कामांना प्राधान्य देऊन रू.५.०० कोटीच्या भुसंपादनासाठी खर्चाच्या तरतुदीस मान्यता देण्यात येते.

७. **पर्यटन विकास – पर्यटन कक्षाची स्थापना**

स्थायी समितीने सादर केलेल्या पर्यटन कक्ष निर्मितीच्या रू.४०.०० लक्षच्या तरतुदीस सर्वकष चर्चा होऊन मान्यता देण्यात येते.

८. **आपत्कालीन व्यवस्थापन**

भारत सरकारद्वारे देशातील काही प्रमुख शहरात आपत्कालीन व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्याचे धोरण निश्चित केले असून यामध्ये औरंगाबाद शहराचा देखील समावेश आहे व या करिता शासन आवश्यक ती मदत करणार असून या कार्यक्रमाअंतर्गत विविध उपक्रम जसे जनजागृती, भुकंप प्रतिरोधक बांधकामाचे प्रशिक्षण, आपत्कालीन आरोग्य सेवा, बांधकाम व शहर विकासाच्या नियमावलीची पुनर्रचना इत्यादी बाबींचा समावेश आहे. भारत सरकारतर्फे राबविण्यात येणाऱ्या या कार्यक्रमांतर्गत एक कायमस्वरूपी आपत्कालीन व्यवस्थापण केंद्र (Emergency Operation Centre) पदमपुरा येथील अग्निशमन विभागाच्या इमारतीच्या परिसरात उभारण्याच्या स्थायी समितीने सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा होऊन मान्यता देण्यात येते तसेच रेस्क्यु व्हॅन खरेदी करीता रू. १.०० कोटीची अतिरिक्त तरतुद करण्यात येते.

९. **ऐतिहासिक व पुरातन इमारती जतन करणे**

औरंगाबाद हे ऐतिहासिक शहर ५२ दरवाजांचे शहर म्हणून जगप्रसिध्द असुन या शहरास अनेक ऐतिहासिक इमारतींचा वारसा लाभलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने बीबीका मकबरा, पानचक्की, सोनेरी महेल या शिवाय मोठमोठे दगडी दरवाजे आहेत. सदरील ऐतिहासिक वास्तुंमुळे औरंगाबाद शहरात देश विदेशातुन मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देत असतात. काळानुरूप या ऐतिहासिक दरवाज्यांची देखभाल दुरूस्ती करणे अत्यंत आवश्यक झालेले आहे. यासाठी पुरातत्व आणि वारसा कायद्यांतर्गत महानगरपालिका हद्दीतील नौबत दरवाजा, काळा दरवाजा, पैठण दरवाजा, रोषन दरवाजा व रंगीन दरवाजा इत्यादी पुरातन दरवाज्यांची देखभाल दुरूस्ती तसेच सभोवतालचे सौंदर्यीकरणासाठी चालु वर्षाकरिता अर्थसंकल्पात रू. ५०.०० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त पर्यटन विभागाकडे उपरोक्त कायद्यान्वये विशेष अनुदान प्राप्ती करिता प्रशासनाने प्रयत्न करावे. तसेच टाऊन हॉल येथील इमारतीस ऐतिहासिक दर्जा प्राप्त झाल्यामुळे सदर इमारतीचे जतन करून परिसर सुशोभीकरणासाठी रू. ५०.०० लक्षची विशेष तरतुद करण्याच्या स्थायी समितीच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

१०. **वाहतुक नगर विकसीत करणे :**

औरंगाबाद शहरात मध्यवस्तीस असलेले मोंढयाचे स्थलांतर जाधववाडी येथे झालेले असून जाधववाडी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात मोठ्या स्वरूपात वाहतुक नगर विकसीत करण्यास मान्यता देण्यात येते.

११. **वार्ड कार्यालय तरतुद :**

स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार प्रत्येक वार्ड कार्यालयास लहान मध्यम स्वरूपाची देखभाल दुरूस्तीची व काही प्रमाणात भांडवली स्वरूपाची  कामे करण्याकरिता उपलब्ध करून दिलेल्या तरतुदीस सर्वानमते मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये ठराव क्र.२७५ नुसार सन २००५-०६ चे सुधारित अंदाजपत्रक तसेच सन २००६-२००७ चे मुळ अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभागृहासमोर सादर करण्यात आले.  सदर बैठकीत सर्वंकष चर्चा होवून सन २००५-०६ चे सुधारित अंदाज जमा रक्कम रू.२२३ कोटी ४३ लाख ९५ हजार, यामध्ये प्रारंभीची शिल्लक ०२ कोटी ८० लक्ष ४५ हजार असे एकूण २२६ कोटी २४ लक्ष ४० हजार रक्कमेचा विचार करून खर्च रक्कम रू.१७३ कोटी १५ लाख २० हजार इतका लक्षात घेता रू.५३ कोटी ०९ लाख २० हजार शिलकीच्या सुधारीत अंदाजास मंजुरी देण्यांत येते.

सन २००५-०६ चे सुधारित व सन २००६-०७ च्या मुळ अंदाजावर सर्व सदस्यांनी अभ्यासपुर्वक चर्चा करून व केलेल्या सूचनांची दखल घेवून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०० नुसार मुळ अंदाजपत्रक रू.२५५ कोटी ८७ लाख १० हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक रू.५३ कोटी ०९ लाख २० हजार असे एकूण रू.३०८ कोटी ९६ लाख ३० हजार जमेचा विचार करून खर्च रू.३०८ कोटी ६० लाख २० हजार अपेक्षित रू.३६.१० लाखाच्या शिलकी अंदाजपत्रकास जमा व खर्च बाजुमध्ये आवश्यक ते फेरबदल व दुरूस्त्यांसह सर्वानुमते अंतिम मान्यता देण्यांत येते.  वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.